## DR. AMBEDKAR COLLEGE, DEEKSHABHOOMI, NAGPUR

## NATIONAL SERVICE SCHEME

## NAME OF THE PROGRAMME: <u>महारक्तदान शिबीर</u>

६ डिसेंबर २०२३

प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,समता सैनिक दल,राष्ट्रीयसेवा योजना विभाग,एन सी सी.विभाग यांच्या संयुक्त विधमाने २६नोहेंबर२०२३ ला दीक्षाभूमी परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापारीनिर्वान दिनानिमित्य अभिवादन करण्याकरिता महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी रा.से.यो.७५ स्वयंसेवकांनी रक्तदान करून महामानवाला अभिवादन केले.यावेळी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई,महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ बी.ए.मेहेरे,रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे,उपस्थित होते.








महा रक्तदान
शिविर


रक्तदान शिविर
SHANKAR NAGAR
Nagpur
Maharashtra
India
2023-12-06(Wed) 10:47(am)
21°C
70°F
Google


वर्ष ३
महा रक्तदान
शिविर









# पेटता..पेटता बोलली रे चिता.....

## संविधान चौकात मध्यरात्री अनुयायी म्हणाले...'भविष्यामध्ये धीर सोडू नका...'

**▸ सकाळ वृत्तसेवा**



नागपूर, ता. ५ : प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाणदिनाचे निमित्त साधून आंबेडकरी अनुयायांद्वारे बुधवारी दीक्षाभूमीवरील अस्थिकलशाला तर संविधान चौकात बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोर अभिवादन कार्यक्रम आयोजित केले आहेत. दरम्यान प्रसिद्ध गीतकार बी काशीनंद यांनी चितारलेल्या, 'पेटता पेटता बोलली रे चिता...जा मुलांनो आता संपली रे कथा...संपल्या संपू द्या अश्रूंच्या अक्षदा...या गीताचे स्मरण करून साश्रु-नयनांनी महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला अनुयायांनी दीक्षाभूमी आणि संविधान चौकात मध्यरात्रीला विविध संस्थांनी आदरांजली अर्पण केली. तर मध्यरात्री १२ वाजता समता सैनिक दलातर्फे 'शब्द मोडू नका, ऊर झोडू नका...जा मुलांनो आता भविष्यामध्ये धीर सोडू नका...असा आशावाद व्यक्त करीत मानवंदना दिली.

बुधवारी (ता. ६) संविधान चौकातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला शहरातील विविध शासकीय, निमशासकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था-संघटना, राजकीय पक्ष, बुद्ध विहार कमिटीतर्फे पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच दीक्षाभूमीवर सकाळपासून भीम बांधवांची गर्दी पाहायला मिळणार आहे. त्या दृष्टीने व्यवस्थाही स्मारक समिती व सामाजिक संघटनांकडून करण्यात आली. स्तुपातील अस्थिकलशाच्या दर्शनानंतर या दीक्षाभूमीवर भीम अनुयायांची गर्दी रात्री उशिरापर्यंत राहणार आहे. सकाळी १० वाजता स्मारक समिती आणि समता सैनिक दलातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात येणार आहे. दरम्यान स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या मार्गदर्शनात भीक्षू संघासह बुद्धवंदना घेतील. याप्रसंगी स्मारक समितीचे पदाधिकाऱ्यांसह बौद्ध उपासक व उपासिकांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती राहणार आहेत. दीक्षाभूमी व संविधान चौक दोन्ही ठिकाणी सकाळी १० वाजता समता सैनिक दलातर्फे मानवंदना देण्यात येणार आहे. बौद्ध अनुयायांची गर्दी बुधवारी पाहायला मिळणार आहे. सर्वत्र पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले बौद्ध धम्म बांधव बाबासाहेबांना नतमस्तक होण्यास येतील. काही भीम संघटनेतर्फे येणाऱ्या अनुयायांसाठी भोजनदान, अल्पोहार, चहा आणि सरबताचे वाटप करण्यात येणार आहे. बुधवारी शहरात 'एक मुकी वेदना' या कार्यक्रमाचे आयोजन उततर नागपुरातील कन्व्हेंशन सेंटरमध्ये सांयकाळी करण्यात आले आहे.




**नागपूर : काढण्यात आलेल्या कॅंडल मार्चमध्ये नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

### दीक्षाभूमीवर 'ब्लड फॉर बाबासाहेब' उपक्रम

■ दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्यावतीने दीक्षाभूमी परिसरात 'ब्लड फॉर बाबासाहेब' उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक रक्तदान करणार आहेत. डॉ. आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांनीसुद्धा रक्तदान करून बाबासाहेबांना अभिवादन करावे. असे आवाहन स्मारक समितीचे विश्वस्त विलास गजघाटे यांनी केले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी.ए. मेहेरे, राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, डॉ. सुजित चव्हाण, प्रा. काजल बांबळ, प्रा. अनुप ढोरे या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत.

**शांतिवनात महापरिनिर्वाण स्वरांजली**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे निमित्त साधून मंगळवारपासून (ता.५) शांतिवन चिचोली येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुद्ध-भीम गीतांचा स्वरांजली कार्यक्रम मंगळवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. ६ डिसेंबरला सकाळी ११ वाजता विशेष परित्ता सुतं पठन घेण्यात येणार आहे. भिक्षुणी व भिक्षु संघाद्वारे हा कार्यक्रम घेण्यात येईल. यावेळी शांतिवन परिसरात बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त प्रशांत नारनवरे, सामाजिक न्याय विभागाचे उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड, मध्य रेल्वेचे आयईएस पवन पाटील, भारतीय बौद्ध महासभेचे संजय पाटील उपस्थित असतील.